मोटार अपघात प्रकरण २४५/२०१८

शिवनंदा वि. अमोल व इतर

निशाणी क्रमांक – ३७

**साक्षीदाराची पुढील सरतपासणी मार्फत त्यांचे विधीज्ञ श्री.ए.ई.कराड यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

१. मी माझ्या साक्षीचे शपथपत्र् न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यावर माझा अंगठा आहे व लिहीलेला मजकूर बरोबर आहे. यादी निशाणी क्र.४ सोबत मी गुन्हयाच्या प्राथमीक अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. ती निशाणी क्र.३८ वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.३९ वर आहे. मरणोत्तर पंचनाम्याची सत्यप्रत निशाणी क्र.४० वर आहे. शवतपासणी फॉर्मची सत्यप्रत निशाणी क्र.४१ वर आहे. शवविच्छेदन अहवालाची सत्यप्रत निशाणी क्र.४२ वर आहे. अपघातामधील वाहनाचे आरटीओ नोंदणी प्रमाणपत्राची प्रत निशाणी क्र.४३ वर आहे. अपघातामधील वाहनाच्या विमा पॉलीसीची प्रत निशाणी क्र.४४ वर आहे.

**उलटतपासणी सामनेवाला क्र.१ व २ तर्फे श्री.ए.एम.के.पटेल विधीज्ञ यांच्यातर्फे**

२. अपघात मी स्वतः पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मृतक हा अपघाताच्या वेळी मोटारसायकल चालवित होता. हे म्हणणे खरे नाही की, मोटारसायकल चालवित असताना तो रस्त्यावरील दुभाजकाला धडकला. हे म्हणणे खरे नाही की, मृतक हा दुभाजकाला धडकल्यामुळे जखमी झाला आणि

मरण पावला. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझ्या मुलाच्या चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की, टँकर क्रमांक MH-12-EQ-8421 चा अपघाताशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये माझ्या मुलाची चूक होती म्हणून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला होता. टँकर चालकाविरुध्द कारवाई व्हावी यासाठी आम्ही अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जासोबत टँकर चालकाविरुध्द कारवाई केल्याबद्दलचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा मृतकाच्या चुकीमुळे झाला आणि म्हणून सामनेवाला क्रमांक १ आणि २ आम्हाला कोणतीही नुकसानभरपाई देणे लागत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पैसे मिळणेसाठी मी सामनेवाला क्रमांक १ आणि २ विरुध्द खोटी कारवाई केली.

<u>उलटतपासणी सामनेवाला क्र.३ तर्फे श्री.एस.व्ही.तापडीया विधीज्ञ यांच्यातर्फे</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, वादातील अपघात हा पुण्याला घडलेला आहे. पुण्याला मृतक एकटाच राहात होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी स्वतः पाहीलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताबद्दल ऐकलेल्या माहितीवर अपघात कसा घडला हे मी माझ्या शपथपत्रात नमूद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा दुरुस्तीपूर्वी आम्ही असे म्हटले होते की, मृतक हा अपघाताच्या वेळी मोटारसायकलवर मागच्या सीटवर बसलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला वैयक्तीकरित्या हे माहीत नाही की, अपघाताच्या वेळी

मोटारसायकल मृतक चालवत होता की किशन गुटे चालवत होता. माझ्या शपथपत्रामध्ये जे नमूद आहे ती मोटारसायकल माझ्या मुलाच्या मालकीची होती हे चुकीचे आहे. मी याबाबत चौकशी केली नाही की ती मोटारसायकल कोणाच्या मालकीची होती. माझ्या मुलाकडे मोटारसायकल चालवण्याचा परवाना होता. तो परवाना त्याने पुण्यातून घेतला होता. त्या वाहन चालवण्याच्या परवान्याची प्रत मी माझ्या अर्जामध्ये दाखल केलेली नाही. माझ्या मुलाविरुध्द चुकीचा गुन्हा नोंदला गेला आहे याबद्दल मी पुण्याच्या न्यायालयामध्ये कारवाई केलेली आहे. त्या कारवाईबद्दलचे कागदपत्रे मी या अर्जामध्ये दाखल केलेले नाहीत.

४. मृतक १२वी पर्यंत शिकलेला होता. त्याच्या शिक्षणाबद्दलचे कोणतेही कागदपत्रे मी माझ्या अर्जामध्ये दाखल केलेले नाहीत. मृतकाला सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरी लागली होती याबद्दलचे नियुक्तीपत्र मी अर्जामध्ये दाखल केलेले नाही. अपघाताच्या पूर्वी माझे पती कधी–कधी दुस–याच्या शेतामध्ये मजूरीचे काम करत होते. आम्हाला शेती नाही. माझे मूळ गाव दगडवाडी, ता. अहमदूपर, जि. लातूर आहे. हे म्हणणे खरे नाही की, या न्यायालयातून नुकसानभरपाई मिळावी म्हणून मी शपथपत्रामध्ये खोटे लिहीले की माझ्या मुलाला सिक्युरिटी गार्ड म्हणून महिन्याला ११ हजार रुपये पगार मिळत होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा माझ्या मुलाच्या चुकीमुळे घडला. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र.१ आणि २ यांच्यासोबत संगनमत करुन नुकसानभरपाई मिळावी म्हणून मी खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे

नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-

दिनांक :- ०६/०४/२०२६.

(आर.बी.भागवत)
जिल्हा न्यायाधीश क्र.२ तथा
सदस्य मोटार अपघात प्रा.,
लातूर